ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २४ जून, १९५९ | अंक २५

## विविध माहिती

**राजकोटच्या दूधपुरवठ्याची योजना**—मुंबई सरकारनें राजकोट शहराला दुधाचा पुरवठा करणारी योजना मंजूर केली आहे. तिच्या अंमलबजावणीसाठी १,४८,००० रुपये खर्च येईल. योजना पूर्वीच्या सौराष्ट्र सरकारनें तयार केलेली आहे. दुधाच्या भुकटीची निर्मिति व निर्जंतुक ताज्या दुधाचा पुरवठा अशीं दोन अंगें तिला आहेत.

**मुंबई राज्याची साखरेची गरज**—मुंबई राज्यांतील साखरेचे कारखाने दरसाल सुमारें ३·३२ लाख टन साखरेचें उत्पादन करतात. त्यांपैकी १·०२ लाख टन साखरेचें उत्पादन सहकारी साखर कारखान्यांकडून होतें. राज्याची वार्षिक गरज ५ लाख टनांची आहे. कमी पडत असलेली साखर बाहेरच्या राज्यांतून आणावी लागते.

**आंब्याच्या रायांची लागवड**—मुंबई सरकारनें कोंकणांत सुमारें २०,००० एकर जमिनींत आंब्यांची लागवड करण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय काजूची लागवडहि मोठ्या प्रमाणावर करण्याची सरकारची योजना आहे. कोंकणांतील अस्सल प्रतीचे कलमी आंबे परदेशांत पाठवून भारताला परदेशीय चलनाची चांगली प्राप्ति होऊं शकेल.

**मिठाच्या निर्यातीची पद्धत**—भारताच्या मिठाची परदेशांत होणारी निर्यात घसरत चालली आहे. त्यामुळें मिठाच्या व्यापाराच्या पद्धतीविषयीं मिठाचे उत्पादक व सरकार ह्यांच्या दरम्यान चर्चा होऊन हा व्यापार स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनकडे द्यावयाचें ठरविण्यांत आलें आहे. मिठाची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न आतां कॉर्पोरेशनतर्फे जोरानें करण्यांत येतील.

**रशिआला तागाची निर्यात**—हिंदची फाळणी झाल्यानंतर रशिआला निर्यात करण्यांत येणाऱ्या तागांत बरीच घट झाली होती. कारण, ताग पिकविणारा प्रदेश पाकिस्तानांत समाविष्ट झाला होता. आतां दहा वर्षांनंतर हिंदनें आपला ताग प्रथमच रशिआला निर्यात केला आहे. १,३५० टन ताग नुकतांच रवाना करण्यांत आला.

**यांत्रिक खेळण्यांचा कारखाना**—कलकत्ता येथें यांत्रिक खेळण्यांच्या एका कारखान्याचें उद्घाटन करण्यांत आलें. भारतांत अशा प्रकारचा हा पहिलाच कारखाना आहे. खेळांतील कळीच्या मोटारी एंजिनें, इत्यादि प्रकारचीं खेळणीं जपानच्या तांत्रिक सहकार्यानें येथें तयार करण्यांत येतील. कारखान्यासाठी २ लाख रुपये भांडवल लागलें.

**आंध्र प्रदेशांतील लोखंडाचे सांठे**—आंध्र राज्याची भूगर्भविषयक पहाणी भारत सरकारच्या तज्ज्ञांतर्फे करण्यांत आली आहे. आंध्र राज्यांत सुमारें ४३ कोटी टन खनिज सांपडेल, असा अंदाज त्यांनीं केला आहे. नुकत्याच झालेल्या पहाणींत आणखी ३,००,००० टन खनिज सांपडल्याचें वृत्त आहे.

**निसर्गोपचार पद्धतीला स्थान**—अखिल भारतीय निसर्गोपचार परिषदेनें ह्या पद्धतीबद्दल भारत व राज्य सरकारकडे जर एखादी योजना मांडली, तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत निसर्गोपचार पद्धतीचीं उपचार केंद्रें स्थापन करण्यासाठी पैशाची सोय करण्यांत येणें शक्य आहे, अशी माहिती श्री. धेबर ह्यांनीं सांगितली आहे.

**आक्षेपार्ह बोलपटांविरुद्ध मोहीम**—आधुनिक बोलपटांतील गुन्हेगारीचें चित्रण आणि उत्तान पद्धतीचा शृंगार ह्यांच्या विरुद्ध श्रीमती लीलावती मुनशी ह्यांनीं प्रचारमोहीम उघडण्याचें ठरविलें आहे. अशा चित्रपटांमुळें मुलांत गुन्हेगार वृत्तीची वाढ होण्यास व अनैतिक वर्तनास उत्तेजन मिळतें, अशी त्यांची तक्रार आहे.

**गोहाटीजवळील तेलाचा कारखाना**—गोहाटीजवळ काढण्यांत येणाऱ्या तेलाच्या शुद्धीकरणाच्या कारखान्याच्या कामाला रुमेनिअन तंत्रज्ञांच्या देखरेखीखाली प्रारंभ झाला आहे. रुमेनिअन सरकारनें कारखान्यासाठी ५·२ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. त्याशिवाय ४९ तंत्रज्ञांना शिक्षण देण्याचेंहि कबूल केलें आहे. कारखाना १९६० सालीं सुरू होईल.

**लहान व मध्यम प्रतीचे कारखाने**—जपानच्या सरकारनें छोट्या व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांबाबत भारत सरकारला सल्ला देण्यासाठी एक प्रतिनिधि मंडळ भारतांत पाठविण्याचे मान्य केलें आहे. जपानमधील छोट्या उद्योगधंद्यांतील सात-आठ तज्ज्ञ ह्या प्रतिनिधि मंडळांत असतील. प्रतिनिधि मंडळ बहुधा ऑगस्टच्या प्रारंभीं भारतांत येईल.

**मलायामधील रेल्वेचें आधुनिकीकरण**—मलायामधील रेल्वे मार्गाचें आधुनिकीकरण करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामाची प्राथमिक पहाणी करण्यासाठी भारताच्या रेल्वे-बोर्डाचे दोन प्रतिनिधी मलायाला गेले आहेत. मलायाच्या वाहतूक मंत्र्यांशीं त्यांनीं वाटाघाटी केल्या. मलायाच्या रेल्वेला लागणारी सामुग्री भारताकडून पुरविण्यांत येण्याचा संभव आहे.

**सहकारी घरबांधणीला मदत**—उत्तर प्रदेश सरकारनें कामगारांसाठी घरें बांधणाऱ्या सहकारी संघटनांना पूर्वीपेक्षा अधिक मदत द्यावयाचें ठरविलें आहे. ही मदत कर्ज व देणगी ह्या रूपांत पूर्वी देण्यांत येत होती व तिची मर्यादा बांधणीच्या खर्चाच्या ७५ टक्के ठरलेली होती. आतां ही मर्यादा ९० टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत आली आहे. मदतीची व्यवस्था पहाण्यासाठी खास कचेरी उघडण्यांत आली आहे.

### बँकांकडील ठेवी आणि खेळत्या चलनी नोटा

( १९५७ अखेर )

| देश | चलन ( लक्ष ) | व्यापारी बँकांकडील ठेवी | खेळत्या चलनी नोटा | खेळत्या चलनी नोटांशीं ठेवींचें प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| अमेरिका ... | अमेरिकन डॉलर | २०,१३,२६० | २,९७,२४० | ६८० |
| ग्रेटब्रिटन ... | पौंड स्टर्लिंग | ६,९२,२९० | २१,२७० | ३३० |
| प. जर्मनी ... | मार्क | ३,५९,१८० | १,६१,३३० | २२० |
| स्वीडन ... | स्वीडिश क्रोनर | १,४१,४३० | ५३,५७० | २६० |
| नॉर्वे ... | नॉर्वे क्रोनर | ५३,७६० | ३२,७९० | १६० |
| डेन्मार्क ... | डॅनिश क्रोनर | ८३,५०० | २९,२८० | २८० |
| स्वित्झरलंड ... | स्विस फ्रॅंक | १,०५,७९० | ५९,३१० | १८० |
| भारत ... | रुपये | १,३६,००० | १,५०,८०० | ९० |
| भारत (२८ मार्च, १९५९)... | रुपये | १,७०,५०० | १,७६,४४० | ९७ |


**अभिनव गुंतवणूक**

**आपणांस आपल्या पैशाचा योग्य मोबदला**

**( शेड्यूल्ड बँक ) बँक ऑफ पूना, लिमिटेड**

याच्या

**तीन — सहा — नऊ — बारा महिने मुदतीच्या ठेवींनें मिळतो.**

कॅशसर्टिफिकेट इतकेंच व्याज. व्याज मिळून शिवाय रकमेची जरूर भासली तर १ ते ५ वर्षे थांबावें लागत नाहीं. व्याज मुदत पुरी झाल्यावरोबर मिळतें व याच रकमेवर पुन्हां व्याज मिळवितां येतें. मुख्य ऑफिस अगर शाखाकचेऱ्यांकडे समक्ष चौकशी करा.

गो. गं. साठे, मॅनेजर.

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५६,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २४ जून, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचीं दहा वर्षें

### रिझर्व्ह बँकेची देखरेख व नियंत्रण ह्यांचा आढावा

१९४९ चा बँकिंग कंपनीज ॲक्ट अंमलांत आला, त्याला आतां १० वर्षें पुरीं झालीं आहेत. तेव्हां, त्या कायद्याचा उद्देश कितपत सफळ झाला, हिंदी बँकांची मजबुती त्यामुळें कितपत वाढली, हिंदी बँकांची उपयुक्तता कितपत सुधारली, ह्याचा आढावा घेणें इष्ट होईल. ह्या कायद्यांत रिझर्व्ह बँकेला बँकांच्या देखरेखीचे व नियंत्रणाचे व्यापक अधिकार दिलेले आहेत; ठेवीदारांच्या हितांचें संरक्षण करून बँकिंगची वाढ योग्य दिशेनें घडवून आणणें हा त्याचा हेतु आहे. (१) बँकांना लायसेन्स देणें, (२) किमान वसूल भांडवल व रिझर्व्ह आवश्यक करणें, (३) तरत्या पैशांचें किमान प्रमाण राखणें, (४) शाखांच्या वाढीवर नियंत्रण ठेवणें, आणि (५) बँकांचीं कर्जें, त्यांचा प्रकार व अटी ह्यांवर नजर ठेवणें, ह्या बाबतींत रिझर्व्ह बँकेनें गेल्या दहा वर्षांत आपली कामगिरी कशी पार पाडली आहे, हें येथें थोडक्यांत स्पष्ट केलें आहे.

### लायसेन्सची तरतूद

बँकांची संख्या भरमसाट वाढूं नये, आणि अस्तित्वांत असलेल्या बँकांपैकी ज्या बँकांची कार्यपद्धति मजबूत आधारावर नाहीं अशांचें तण काढून टाकणें, ह्या दृष्टीनें बँकांच्या लायसेन्सची तरतूद कायद्यांत केलेली आहे. परंतु, रिझर्व्ह बँकेनें ह्या तरतुदीचा वापर अत्यंत काळजीनें आणि सहानुभूतीपूर्वक केला आहे. बँकांना आपला कारभार सुधारण्यास मदत व्हावी असा त्यामागें दृष्टिकोन होता; लायसेन्स नाकारून त्या एकाएकीं बंद पाडणें हा नव्हता. लायसेन्स देण्यापूर्वी बँकेचे हिशेब तपासले जातात आणि ज्या चुका आढळतात त्या संबंधित बँकेच्या नजरेस आणून सुधारण्याची सूचना दिली जाते. बँकेला मग रिझर्व्ह बँकेकडे वक्तशीर प्रगतीचे रिपोर्ट पाठवावे लागतात; ह्या प्रगतीची पुन: तपासणी केली जाते; तेव्हां, रिझर्व्ह बँकेनें किती बँकांना लायसेन्स दिलें आणि किती बँकांना नाकारलें, ह्यापेक्षा अजूनहि ज्यांना लायसेन्स मिळालेले नाहींत अशा बँकांनीं किती सुधारणा केली ह्या गोष्टीवरूनच लायसेन्सबाबत धोरणाचें मूल्य ठरविलें पाहिजे. १९५८ अखेर, ३१७ बँका आपल्या प्रगतीचे रिपोर्ट रिझर्व्ह बँकेकडे वक्तशीर पाठवीत होत्या, तर ४२ बँकांचा कारभार रिझर्व्ह बँकेनें घालून दिलेल्या अटींनुसार किंवा सूचनेनुसार चालू होता. १९५१ मध्यें बँकांच्या लायसेन्सिंगबाबत तरतूद अंमलांत आली, तेव्हांपासून १९५८ पर्यंत ५२ शेड्यूल्ड बँका व ८ बिगर-शेड्यूल्ड बँका ह्यांना लायसेन्स देण्यांत आला; २ शेड्यूल्ड बँका व १२६ बिगर-शेड्यूल्ड बँका ह्यांना तो नाकारण्यांत आला. ठेवींच्या दृष्टीनें विचार केला, तर लायसेन्स देण्यांत आलेल्या शेड्यूल्ड बँका आणि चार स्टेट-असोसिएटेड बँका ह्यांचेकडे मिळून एकूण बँक-ठेवींच्या ९३% ठेवी होत्या. म्हणजे, ज्या बँकांना अजून लायसेन्स दिलेला नाहीं, अशांचेकडे फक्त ७% ठेवी आहेत.

### किमान भांडवल व रिझर्व्ह

लहान लहान बँका कमी भांडवलावर मोठा व्यवहार करीत असत, त्या प्रवृत्तीला आळा घालून ठेवीदारांच्या हितरक्षणासाठी किमान भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या अटी ठरविण्यांत आल्या. ह्या अटी पार पाडण्यास बँकांना प्रारंभीं तीन वर्षांची मुदत देण्यांत आली होती. 'ब' वर्गातील राज्यांतील बँकांना ती मुदत ३१ मार्च, १९५५ अखेर होती. ह्याहि मुदतीनंतर, वैयक्तिक बँकांना लायकीनुसार मुदतवाढ देण्यांत आली आहे. १९५८ अखेर २५ बँकांना अशा मुदतवाढीचा फायदा मिळत आहे. बँकांना आपलें भांडवल वाढवितां यावें, ह्यासाठी मध्यवर्ती सरकारनें भांडवल उभारणीवरील धोरण बँकांच्या बाबतींत थोडें सैल केलें. १९५१ ते १९५८ ह्या मुदतींत ६० बँकांनीं आपलें वसूल भांडवल वाढविलें आणि १४ बँकांनीं आपलें व्यवहारक्षेत्र कमी करून त्या किमान भांडवलाच्या अटींत येऊन बसल्या. १७३ बँकांनीं बँकिंगचा व्यवहार बंद तरी केला किंवा त्या व्हॉलंटरी लिक्विडेशनमध्यें गेल्या.

वसूल भांडवलाइतका रिझर्व्ह फंड होईपर्यंत बँकांनीं आपल्या वार्षिक नफ्यापैकी २०% रकम रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केली पाहिजे असा बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचा दंडक आहे. २६७ बँकांनीं हा दंडक मोडल्याचें आढळून आलें; त्या त्या वर्षांच्या शिलकी फंडसमधून अथवा त्यानंतरच्या वर्षांच्या नफ्यांतून ही तूट भरून काढण्यास त्या बँकांना सांगण्यांत आलें. १९५१ मध्यें, २८% शेड्यूल्ड बँकांचा रिझर्व्ह फंड त्यांच्या वसूल भांडवलाइतका होता; १९५८ मध्यें ३५% शेड्यूल्ड बँकांचे बाबतींत तो वसूल भांडवलाइतका झाला; बिगर-शेड्यूल्ड बँकांची तत्सम प्रमाणें अनुक्रमें १८% व २४% होतीं; ह्यावरून ह्याबाबतचा दंडक कसा हितकारक ठरला, हें दिसून येईल.

### किमान तरत्या जिंदगींचें प्रमाण

एकूण डिमांड व टाइम देण्याच्या २०% इतकी जिंदगी तरती पाहिजे; त्यामुळें नेहमींच्या रोकड रकमेस अडचणीचे वेळीं पुष्टी मिळूं शकते, असा प्रस्तुत तरतुदीचा उद्देश आहे. बहुतेक बँकांना हा दंडक पाळणें अवघड गेलें नाहीं. ज्या बँकांना तें जमलें नाहीं, त्यांपैकी कांहीं व्हॉलंटरी लिक्विडेशनमध्यें गेल्या; कांहींना लायसेन्स नाकारण्यांत आला. त्रावणकोर-कोचीनमधील बँकांच्या विशिष्ट परिस्थितीमुळें त्यांना ३१ मार्च, १९५४ अखेर १०% ची सवलत देण्यांत आली; हळुहळु ही सवलत कमीकमी करून, आतां त्यांना देण्यांच्या १७½% इतकी जिंदगी तरती ठेवावी लागते. तेथील ७०% बँका कलमाच्या अटी आतां पाळूं शकतात.

### शाखा विस्तार

बँकांनीं भरमसाठ शाखा उघडूं नयेत आणि ज्या ठिकाणीं आधींच जरूरीपेक्षा ज्यास्त बँककचेऱ्या आहेत तेथें आणखी कचेऱ्यांची गर्दी होऊं नये, ह्या दृष्टीनें बँकांच्या शाखावाढीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला देण्यांत आला.

युद्धकाळांत आणि युद्धानंतरच्या काळांत बँकांनीं आधींच भरमसाठ शाखा वाढविल्या होत्या, त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी सुरवातीच्या नियंत्रणाचे अधिकार कडकपणें वापरण्यांत आले. १९५३ नंतर त्याबाबतचें धोरण जरा सैल करण्यांत आलें. १९५३ ते १९५८ ह्या मुदतींत शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ९४७ ची भर पडून त्यांची संख्या ३,६१७ झाली, ह्यावरून रिझर्व्ह बँकेच्या धोरणामुळें शाखावाढीस व्यत्यय आलेला नाहीं, हें स्पष्ट होईल. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या ह्याच मुदतींत ३५२ नें कमी होऊन ९९९ वर आल्या, हें मात्र सत्य आहे. कित्येक बिगर-शेड्यूल्ड बँकांनीं बिगर-बँकिंग कंपनींत आपलें रूपांतर करून घेतलें आणि कांहीं बिगर शेड्यूल्ड बँका शेड्यूल्ड बँकांत दाखल झाल्या, त्याचा हा अंशतः परिणाम आहे. ५०,००० लोकवस्तीपेक्षा लहान जागीं १९४९ मध्यें ५१% कचेऱ्या होत्या; १९५८ मध्यें तें प्रमाण ५४% झालें ही गोष्ट शाखाविस्ताराच्या धोरणास पुष्टी देणारी आहे. १९४९ मध्यें ५०,००० लोकवस्तीपेक्षा लहान अशा ६३१ जागीं बँक-कचेऱ्या होत्या; आतां अशा १,३२७ जागीं बँककचेऱ्या आहेत. अर्थात्, अजून ३,०१८ लायक गांवांपैकीं १,५१२ गांवीं अजून एकहि बँककचेरी नाहीं.

### कर्जांवर नियंत्रण

सर्व बँकांना मिळून, किंवा वैयक्तिक बँकांना अथवा बँकांच्या गटांना, त्यांनीं कर्ज कोणत्या कारणांसाठीं द्यावें किंवा देऊं नये, तारणावरील कर्जास मार्जिन किती असावें, इत्यादि सूचना देण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस आहे. त्या अधिकाराचा वापर मे, १९५६ मध्यें प्रथम करण्यांत आला आणि अन्नधान्यें व इतर कांहीं माल ह्यांचे तारणावरील कर्जें नियंत्रित करण्यांत आलीं. हीं नियंत्रणें जरूरीप्रमाणें कमीजास्ती प्रमाणांत तेव्हांपासून चालूंच आहेत. बँकिंग कंपन्यांच्या कायद्यानें रिझर्व्ह बँकेला खूपच व्यापक अधिकार दिलेले असले, तरी रिझर्व्ह बँकेनें तें अशा रीतीनें वापरलें आहेत, कीं त्यामुळें बँकांच्या कारभाराची पातळी सुधारावी; शासन करून नियंत्रणें अंमलांत आणण्याचा सोपा पर्याय रिझर्व्ह बँकेनें अवलंबिला नाहीं. बँकांना खरोखरच अडचण भासली, तर ती दूर होईपर्यंत त्यांना माफी किंवा मुदतवाढ देण्याचें रिझर्व्ह बँकेचें धोरण असे व आहे.


## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ | सारस्वत बँक गृह, मुंबई ४. | टेलिफोन : २७०९४

बँकेचे समासद् आणि ठेवीदार यांच्या सोईसाठी

आमच्या वरळी, दादर आणि पुणें शाखेंत माफक दरांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करण्यांत आली आहे.

सविस्तर माहिती शाखाधिकाऱ्यांकडे मिळेल.

शाखा : फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, बेळगांव.
महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव मुंबई ४.


## दि सांगली बँक लिमिटेड, सांगली

[ चेअरमन : श्री. आर. जी. शिंदे, आय. ए एस., एम्. ए., एलएल्. बी., कलेक्टर, द. सातारा, सांगली, (एक्स ऑफिशिओ) मॅनेजर : एम्. के. गुते, एम्. ए., एलएल्. बी., सी. ए. आय्. आय्. बी. ]

दि सांगली बँक लि. ला ता. ३१।१२।१९५८ रोजीं पुऱ्या झालेल्या सालांत, मागील सालचा पुढें ओढलेला नफा रु. १,५४०-१९ धरून निव्वळ नफा रुपये १,६०,३२५-९९ झाला. या नफ्याची वांटणी खालीलप्रमाणें केली आहे.

| | | |
|---|---|---|
| ( १ ) जनरल रिझर्व्ह | रु. | ७,००० |
| ( २ ) कॉंटिजंट फंड | „ | ११,००० |
| ( ३ ) इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड | „ | १०,००० |
| ( ४ ) इन्कमटॅक्सकरतां तरतूद | „ | ७६,००० |
| ( ५ ) १२% करमाफ डिव्हिडंड | „ | ५४,००० |
| ( ६ ) पुढील वर्षासाठीं शिल्लक | „ | २,३२५-९९ |
| | रुपये | १,६०,३२५-९९ |

बँकेची शाखा निपाणी येथें ता. ३०।५।१९५८ ला उघडली असून तेथील शाखेचें काय समाधानकारक चालूं आहे. आतां बँकेच्या १४ ठिकाणीं शाखा आहेत.

### बँकेचा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ४,५०,००० | रोख व इतर बँकांत | ३४,४१,४९२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७,३०,००० | इन्व्हेस्टमेंटस | ६८,४६,६७२ |
| ठेवी व इतर | १,७८,४७,२८९ | ॲडव्हान्सेस | ९८,७२,१०२ |


## अल्प रकमांवर आकर्षक व्याज देणाऱ्या योजना

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

प्रत्येकी रु. १००, रु. ५०० व रु. १००० चीं कॅश सर्टिफिकिटें.

३ वर्षें मुदत सर्टिफिकिटास खरेदी किंमत शेंकडा रु. ८८·७१ व ५ वर्षें मुदत सर्टिफिकिटास खरेदी किंमत शेंकडा रु. ८१. व्याजाचा दर चक्रवाढ व्याजानें द. सा. द. शें. अनुक्रमें चार व सव्वाचार टक्के.

विशाल महाराष्ट्रांत व अन्यत्र ४६ शाखा. महाविदर्भ व मराठवाड्यांत पुढील ठिकाणीं शाखा आहेत. तेथील जनतेनें त्यांच्या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा.

अकोला, अमरावती, औरंगाबाद, हिंगोली, जालना, खामगांव, लातूर, मोमिनाबाद, नागपूर, नांदेड, परळी वैजनाथ व यवतमाळ.

मुख्य कचेरी थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. — चिं. वि. जोग, मॅनेजर.

### इजिप्तला वाढत्या लोकसंख्येचा धोका

इजिप्तमधील लोकसंख्येच्या वाढीच्या वेगानें त्या देशाची अर्थव्यवस्था झपाट्यानें बिघडत चालली आहे. नासर सरकार अधिकारावर आल्यापासून त्यानें आर्थिक सुधारणा भराभर अंमलांत आणण्याचें धोरण स्वीकारलें आहे. ठिकठिकाणीं नवे कारखाने उभारण्यांत येत आहेत. नवीन जमिनी लागवडीयोग्य करण्यांत येत आहेत. जमीनधारणेची पद्धतहि अधिक न्याय्य करण्यांत येत आहे. पण त्याचा फारसा उपयोग होत नाहीं. कोणतेंहि सरकार अधिकारावर आलें तरी त्याला आर्थिक विकासाचें काम करणें अतिशय अवघड जाणार आहे. ह्याचें एकमेव कारण म्हणजे लोकसंख्येची होणारी भरमसाठ वाढ. इजिप्तमधील लोक मुख्यतः नाइल नदीच्या खोऱ्यांत दाटीनें राहिले आहेत. देशाचा बाकीचा भाग ओसाडच आहे. विसाव्या शतकाच्या आरंभापासून लोकसंख्या इतकी वाढूं लागली कीं हें खोरें आतां मनुष्यांनीं पुरेपूर भरून गेलें आहे. १९०० सालांत १ कोटी इजिप्शिअन् लोक ५० लाख एकर पिकाऊ जमिनीच्या साह्यानें आपली गुजराण करीत होते. आज २·३ कोटी इजिप्शिअन लोक अवघ्या ६० लाख जमिनीवर अवलंबून आहेत. पूर्वी इजिप्शिअन शेतकरी दर आठवड्याला एकदां तरी मांसाहार करीत असत. त्याशिवाय सणासुदीलाहि मांस खाणें लोकांना परवडत असे. अंड्यांचा समावेशहि आहारांत होता; पण आज त्यांना मांस अगर अंडीं मिळत नाहींत. फक्त धान्यावर व भाजीपाल्यावर निर्वाह करावा लागतो. शेतकऱ्याला आपल्या शेतांतील माल विकून कपडा, तेल, साखर, इत्यादि पदार्थ महाग दरानें विकत घ्यावे लागतात. त्याचें रहाणीचें मान खालावलें आहे.

### वधू-वरांचें सरासरी वय २४ व २७

युनायटेड नेशन्सनें १९५८ सालविषयक प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांप्रमाणें, अविवाहितांपेक्षा विवाहित जास्त काळ जगतात; विवाह जास्त वर्षे टिकून रहातात आणि विधवा व अनाथ अर्भकें ह्यांच्या सामाजिक प्रश्नाची तीव्रता कमी होत आहे. वधूचें सरासरी वय २४ आणि वराचें सरासरी वय २७ असलेलें आढळतें. अलास्का, पनामा कालव्याजवळील प्रदेश आणि फॉकलंड बेटें येथें स्त्रियांचा विवाह अधिक सुलभतेनें होतो, तर इजिप्त व अल्जेरिया येथील युरोपियन नागरिकांना पत्नी लवकर मिळूं शकते. बहुतेक देशांत घटस्फोटांची संख्या वाढत आहे. युनायटेड स्टेट्समध्यें त्याचें प्रमाण सर्वांत जास्त (दर हजारीं २·२) आणि उत्तर आयर्लंडमध्यें सर्वांत कमी (०·०७) आहे.

---

### चिनी शास्त्रीय प्रगतीची अमेरिकेला भीति

चिनी भाषेतील शास्त्रीय वाङ्मयाचें इंग्रजींत भाषांतर करण्याचा उपक्रम अमेरिकन सरकार आतां करीत आहे. कम्युनिस्ट चीनमधील शास्त्रीय संशोधनाच्या स्पर्धेची भीति अमेरिकन सरकारला वाटूं लागली आहे, ह्याचें हें निदर्शक आहे. अमेरिकेनें रशियांतील प्रगतीची उपेक्षा केली आणि अखेर रशियन स्पुटनिकनें त्याला एकदम जागें केलें; त्याची चीनच्या बाबतींत पुनरावृत्ति होऊं नये ह्याची दक्षता आतांपासूनच घेण्यास प्रारंभ झाला आहे. चिनींतून इंग्रजींत भाषांतर करण्याचे मार्गांत अनेक अडचणी आहेत, त्या १९६१ अखेर पूर्णपणें दूर होतील अशी अपेक्षा आहे. तोंवर अशा भाषांतराला गति प्राप्त होणार नाहीं.


## श्रीमहालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

**( रौप्यमहोत्सव वर्ष )**

फोन नं. २३७ ] —१६७ मंगळवार पेठ, कोल्हापूर.— [ स्थापना : १० नोव्हेंबर, १९३३

दि. ३१ मे, १९५९ अखेर :

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. २,००,००० | रिझर्व व स्टॅट्यूटरी फंड | रु. १,१४,६४६ |
| खपलेलें भाग भांडवल | रु. १,४३,७५५ | ठेवी | रु. १६,१८,५८१ |

खेळतें भांडवल रु. २०,२८,१७०

★ सवलती— कर्जरुपानें आर्थिक मदतीच्या सोयी. ★ स्वल्प व्याजाचा दर.
★ परत फेडीसाठीं सोयीस्कर सवलती. ★ रिबेटची योजना.

यामुळें सभासदांचा संस्थेविषयीं गेलीं पंचवीस वर्षे आदर वाढतच आहे.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
★ सहकारी क्षेत्रांत सतत भरीव व चोख कार्य.
★ सतत गेलीं पंचवीस वर्षे 'अ' वर्ग. ★ कोल्हापूर जिल्ह्यांत आघाडीवर असलेली सहकारी संस्था.

नियमासंबंधीं अगर माहितीसंबंधीं समक्ष वा पत्रद्वारें चौकशी करावी.

गो. वा. कुलकर्णी,
इन् चार्ज मॅनेजर.

दा. श्री. मुनीश्वर,
अध्यक्ष.

# THE PRESIDENCY INDUSTRIAL

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 Rs. | | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|---|
| | 1. | **Capital** | | |
| 10,00,000 | | *Authorised Capital:* 10,000 Shares of Rs. 100 each ... | | 10,00,000—00 |
| 10,00,000 | | *Issued Capital:* 10,000 Shares of Rs. 100 each ... | | 10,00,000—00 |
| 7,50,000 | | *Subscribed and Paid-up Capital:* 10,000 Shares of Rs. 100 each Rs. 75 per share called up ... | 7,50,000—00 | |
| 19,425 | | Less: 259 Shares forfeited ... | 19,425—00 | |
| 7,30,575 | | 9741 | 7,30,575—00 | |
| 9,750 | | Less: Calls unpaid ... | 9,750—00 | |
| 7,20,825 | | | 7,20,825—00 | |
| 9,665 | | Add: Forfeited Shares ... | 9,665—00 | |
| 7,30,490 | | | 7,30,490—00 | 7,30,490—00 |
| 20,725 | 1. | **A Calls Received in Advance:** ... | | 20,650—00 |
| 2,79,160 | 2. | **Reserve Fund & Other Reserves** ... | | 2,79,160—45 |
| | 3. | **Deposits and Other Accounts** | | |
| 10,79,351 | | (a) Fixed Deposits ... | 8,02,755—00 | |
| 10,94,252 | | (b) Savings Bank Deposits ... | 10,35,824—01 | |
| 10,79,502 | | (c) Current Deposits and Contingency accounts etc. | 11,15,148—43 | 29,53,727—44 |
| 32,53,105 | | | | |
| | 4. | **Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| 13,21,994 | | (1) In India. ... | 13,75,446—58 | |
| ... | | (2) Outside India. ... | ... | 13,75,446—58 |
| | | *Particulars:* | | |
| 13,21,994 | | (a) Secured by part of Banking Company's Investments ... | 13,75,446—58 | |
| ... | | (b) Unsecured. ... | ... | |
| 13,21,994 | | | | |
| 12,123 | 5. | **Bills Payable** ... | | 12,713—57 |
| | 6. | **Bills for Collection, (being Bills Receivable as per contra)** | | |
| 47,614 | | (1) Payable in India ... | 79,744—78 | |
| ... | | (2) Payable outside India ... | ... | 79,744—78 |
| | 7. | **Other Liabilities** | | |
| 57,226 | | (1) Interest Suspense ... | 67,624—17 | |
| 10,733 | | (2) Unclaimed Dividends ... | 10,636—80 | |
| 877 | | (3) Branch Adjustments ... | 33,108—17 | |
| 30,183 | | (4) Other Sundry Liabilities ... | 38,747—50 | 1,50,116—64 |
| 99,019 | | | | |
| 57,64,230 | | Carried over ... | | 56,02,049—46 |

# BANK, LIMITED, POONA CITY.

## AT 31st DECEMBER 1958.

| 31-12-1957 Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 4,95,774 | **1. Cash** In hand, with Reserve Bank and State Bank of India.. | | 3,54,129—84 |
| | **2. Balances with other Banks** ( In Current Account ) | | |
| 15,102 | ( a ) In India ... | ,811—68 | |
| ... | ( b ) Outside India ... | ... | 18,811—68 |
| ... | **3. Money at Call and Short Notice** — | | ... |
| 22,20,419 | **4. Investments at cost.** | | 22,20,419—12 |
| | ( 1 ) Securities of the Central and State Governments and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. ( Securities of the face value of Rs. 22,25,000 are with Banks against overdraft arrangements ) | | |
| 22,07,869 | ( Average market value Rs. 20,45,436—80 ) ... | 22,07,869—12 | |
| | ( 2 ) Ordinary Shares fully paid up. | | |
| 12,550 | ( Realisable value Rs. 12,550 ) ... | 12,550—00 | |
| ... | ( 3 ) Debentures or Bonds ... | 0—00 | |
| ... | ( 4 ) Other Investments ... | 0—00 | |
| ... | ( 5 ) Gold ... | 0—00 | |
| | (Investments, which have no market quotations have been shown at their realisable value ) | | |
| | | 22,20,419—12 | |
| 27,05,264 | **5. Advances :** ( Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the auditors ) ... | | 26,01,926—23 |
| | *Loans, Cash Credits, Overdrafts, etc.* | | |
| 27,04,028 | (1) In India ... | 25,79,624—40 | |
| ... | (2) Outside India ... | ... | |
| | | 25,79,624—40 | |
| | *Bills, Discounted and Purchased* (excluding Treasury Bills of the Central and State Governments. ) | | |
| 1,236 | (1) Payable In India ... | 22,301—83 | |
| ... | (2) Payable outside India ... | ... | |
| 27,05,264 | | 26,01,926—23 | |
| | **Particulars of Advances :—** | | |
| 14,26,955 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 12,40,931—50 | |
| 10,00,974 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 9,93,913—71 | |
| 9,461 | (3) Debts considered good, secured by personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 10,245—95 | |
| 2,67,874 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for. | 3,56,835—07 | |
| 27,05,264 | | 26,01,926—23 | |
| ... | (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | Nil | |
| ... | (6) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Company are interested as Directors, partners or Managing Agents, or in the case of private companies as Members ... | Nil | |
| ... | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | Nil | |
| ... | (8) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case of private Companies, as Members. ... | Nil | |
| ... | (9) Due from Banking Companies ... | Nil | |
| 54,36,559 | Carried Over ... | | 51,95,286—87 |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL

## BALANCE SHEET AS

31-12-1957

| Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 57,64,230 | Brought Forward ... | | 56,02,049—46 |
| ... | 8. **Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra :** | | ... |
| | *Contingent Liability :* | | |
| | There is a claim for Rs. 7634—08 against the Bank which is not acknowledged as a debt, | | |
| 57,64,230 | Total Rs. ... | | 56,02,049—46 |

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1958*

| Rs. | EXPENDITURE | | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,44,808 | 1. Interest paid on Deposits and Borrowings etc. ... | | 1,45,838—12 |
| | 2. Salaries and Allowances and Provident Fund :— ... | | |
| 2,500 | Director | 0—00 | |
| 7,344 | Manager | 7,200—00 | |
| 62,449 | Others | 62,907—22 | 70,107—22 |
| | 3. Directors' and Local Committee Members' Fees : | | |
| ... | Fees | 0—00 | |
| 910 | Allowances (Travelling Expenses) | 959—00 | 959—00 |
| 4,971 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting etc. ... | | 5,155—84 |
| 535 | 5. Law Charges. ... | | 4,371—94 |
| 1,350 | 6. Postage, Telegrams and Stamps. ... | | 974—32 |
| 1,200 | 7. Auditors' fees ... | | 1,200—00 |
| 5,769 | 8. Depreciation on and Repairs to the Banking Company's Property. ... | | 5,357—83 |
| 7,407 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 8,160—86 |
| 1,772 | 10. Loss from sale of or dealings with Non-Banking Assets ... | | 1,904—47 |
| 9,266 | 11. Other Expenditure. ... | | 8,951—39 |
| 2,50,281 | Total Rs. ... | | 2,52,980—99 |

| Rs. | INCOME | Rs. nP. |
|---|---|---|
| | (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions.) | |
| 1,91,691 | 1. Interest and Discount. ... | 1,77,188—14 |
| 5,777 | 2. Commission, Exchange and Brokerage. ... | 4,911—35 |
| 360 | 3. Rent. ... | 360—00 |
| ... | 4. Net Profit on sale of Investments, Gold, Silver, Land, premises and other Assets (not credited to Reserves or any particular Fund or Account.) ... | 0—00 |
| ... | 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold and Silver, Land, Premises and other Assets (not credited to) Reserves or any particular Fund or Account. ... | 0—00 |
| 3,664 | 6. Income from Non-Banking assets and Profit from sale of or dealing with such assets ... | 3,709—44 |
| 272 | 7. Other Receipts ... | 68—75 |
| 48,517 | 8. Loss ... | 66,743—31 |
| 2,50,281 | Total Rs. ... | 2,52,980—99 |

## AUDITOR'S REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of the Presidency Industrial Bank Ltd., Poona, as at 31st December, 1958 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the returns of Bombay Branch audited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to Sub-section (1) and (2) of Section 211 and Sub-section (5) of Section 211 and Section 227 (5) of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are, therefore, drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

# BANK, LIMITED, POONA CITY.

**AT 31st DECEMBER 1958.**

| 31-12-1957 Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 54,36,559 | Brought Forward ... | | 51,95,286—87 |
| | **6. Bills Receivable. Being Bills for Collection as per contra** | | |
| 47,614 | (1) Payable in India ... | 79,744—78 | |
| ... | (2) Payable outside India ... | ... | 79,744—78 |
| ... | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra** ... | | ... |
| | **8. Premises :** | | |
| | Cost as per last Balance Sheet ... | 25,013—87 | |
| 16 980 | Less : Total Depreciation written off ... | 8,383—87 | 16,630—00 |
| | **9. Furniture and Fixtures :** | | |
| | Cost as per last Balance Sheet ... | 40,968—11 | |
| | Additions during the year. ... | 599—38 | |
| | | 41,567—49 | |
| | Less : Sales during the year ... | ... | |
| | | 41,567—49 | |
| 20,340 | Less : Total Depreciation written off ... | 22,008—19 | 19,559—30 |
| | **10. Other Assets Including Silver** | | |
| 20,601 | (1) Interest accrued on Investments ... | 20,601—42 | |
| 15,631 | (2) Printing and Stationery on hand ... | 12,753—00 | |
| 1,662 | (3) Deposit with Telephone and Electric Company | 1,518—00 | |
| 40,110 | (4) Income-Tax paid in advance and at source ... | 37,153—72 | |
| 14,240 | (5) Legal Expenses pending adjustments ... | 9,567—92 | |
| 243 | (6) Stamps on hand ... | 237—75 | |
| 7,477 | (7) Balance in c/a with Co-op Banks ... | 3,293—41 | |
| 895 | (8) Outstanding Debtors ( Rs. 420/- considered Doubtful ) ... | 1,154—36 | |
| 445 | (9) Guarantee Under Letter of Credit ... | ... | 86,279—58 |
| 1,01,304 | | | |
| 72,542 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | 68,914—00 |
| | **12. Profit and Loss Account** | | |
| | Loss as per last Balance Sheet ... | 68,891—62 | |
| 68,891 | Add : Loss for the year as per annexed Statement ... | 66,743—31 | 1,35,634—93 |
| 57,64,230 | Total Rs. ... | | 56,02,049—46 |

**B. Y. Pathak,** *Accountant.*

**G. D. Joglekar,** *Manager*

**G. U. Chitale** *Vice-Chairman.*

**C. T. Chitale**
**W. P. Vaidya**
**C. D. Joshi**
**S. K. Bhagwat**
**Mohanlal Hansraj**
} *Directors.*

Shri **G. R. Sathe** being sick and Shri. **V. N. Sardesai** being out of station did not sign.

We report that :—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

(b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank.

(c) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Bombay Branch of the Bank.

(d) The Bank's Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of accounts and the returns.

(e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for Banking Companies and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December 1958, and the Profit and Loss Account gives true and fair view of the loss for the year ended upon that date.

Poona City,
Dated 23rd May, 1959.

**B. C. ABHYANKAR & Co.,**
*Chartered Accountants.*

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK LIMITED POONA

*( Registered on 19th November, 1936 )*

## TWENTY-SECOND REPORT OF THE DIRECTORS

The Directors beg to submit to the Share-holders, the Balance Sheet and the Profit and Loss Account for the year ended 31st December 1958. The Auditors' report is also annexed.

The year under report shows a loss of Rs. 66,743—31 nP. and taking into account the balance of the loss of Rs. 68,891—62 nP. carried forward last year, the total loss for the year comes to Rs. 1,35,634—93nP. This loss is also due to accrued interest of Rs. 67,624—17 nP. being taken to Interest Suspense account instead of the Profit and Loss Account, for some technical reasons.

Under Article 104 of our Articles of Association, two of the Directors, Shri C. T. Chitale and Shri V. N. Sardesai retire by rotation. The retiring Directors are eligible for re-election and offer themselves for the same.

Shri Chhotalal D. Joshi, Shri S. K. Bhagwat and Shri Mohanlal Hansraj who were co-opted under Article 94 of the Company also retire and offer themselves for re-election.

The Share-holders are requested to appoint Auditor or Auditors, and to fix his or their remuneration.

The Board takes this opportunity of offering thair thanks to the Manager and his Staff, for their efficient and honest services to the Bank.

Poona
23rd May, 1959.

G. U. CHITALE
*Vice-Chairman.*

**तोंडी परीक्षा रद्द केली**—तेलंगण भागांतील वैद्यकीय व एंजिनिअरिंग कॉलेजांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या उमेदवारांची तोंडी परीक्षा घेण्याची पद्धत आंध्र प्रदेश सरकारनें रद्द केली आहे. आंध्र विभागांत मात्र ही पद्धत चालू ठेवण्यांत येणार आहे. तेलंगण विभाग कमिटीच्या शिफारसीप्रमाणें असें करण्यांत आलें आहे.

**भिलई येथें सिमेंटचा कारखाना**—भिलई येथील झोत-भट्टीपासून मिळणाऱ्या राखेपासून सिमेंट बनविण्याचा एक कारखाना काढण्याचा भारत सरकारचा विचार आहे. त्यासाठी असोसिएटेड कंपनींशीं वाटाघाटी चालू आहेत. भिलईचा कारखाना पूर्णपणें चालू झाल्यावर आणखी दुय्यम उद्योगधंदे निघण्यासारखे आहेत.

**अंतरिक्ष संशोधनाबाबत निराशा**—येत्या कांहीं वर्षांत मनुष्यासहित अग्निबाण अंतरिक्षांत सोडणें शक्य होईल; परंतु अनंत अंतरिक्षाचें खरेंखुरें संशोधन करण्याचा प्रारंभ होण्यासहि अजून कित्येक दशकें अवकाश आहे, असा अभिप्राय संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अंतरिक्ष कमिटीनें व्यक्त केला आहे. ह्या कमिटींत रशिआ वगळून इतर देशांचे शास्त्रज्ञ काम करीत आहेत. रशिआनें कमिटीवर बहिष्कार घातला आहे.

**गोअरिंगच्या मालमत्तेची विल्हेवाट**—नाझी जर्मनीचा एक प्रमुख पुढारी हरमन गोअरिंग ह्यांच्या मालमत्तेची विक्री करून नाझी राजवटींत छळ झालेल्यांना अगर त्यांच्या नातलगांना नुकसानभरपाई देण्यांत यावी असा हुकूम कोर्टानें काढला आहे. त्यांच्या मालमत्तेंत बँकेंतील पैसा, सरकारी रोखे, कलात्मक वस्तू इत्यादींचा समावेश आहे.

**प्लॅस्टिकच्या धंद्याचा अभ्यास**—राष्ट्रीय उत्पादन कौंसिलनें पुरस्कृत केलेलें दहा जणांचें एक मंडळ इटली, अमेरिका व जपान ह्या देशांच्या दौऱ्यावर गेलें आहे. प्लॅस्टिकचा उपयोग औद्योगिक कारखान्यांत कसा करण्यांत येतो ह्याचा विशेष अभ्यास हें मंडळ करणार आहे. निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील उत्पादनाचा अभ्यास करण्यासाठी अशीं सात मंडळें चालू वर्षी परदेशांत जाणार आहेत.

**सेंट्रल नर्सिंग सर्व्हिस**—भारत सरकारनें सेंट्रल नर्सिंग सर्व्हिसची स्थापना केली आहे. मध्यवर्ती सरकारतर्फे चालविण्यांत येणाऱ्या इस्पितळांतील परिचारिकांचाच त्यांत समावेश केला आहे. कारण, राज्यसरकारें आपआपल्या राज्यांतील इस्पितळें चालवीत असतात. सध्यां दिल्ली येथील मध्यवर्ती सरकारच्या इस्पितळांतील ३०० नर्सेस सर्व्हिसमध्यें समाविष्ट केल्या आहेत

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**काश्मीरच्या सरकारचें हॉटेल**—काश्मीरच्या सरकारनें प्रवाशांच्या सोयीसाठी श्रीनगर येथें एक हॉटेल चालविण्याचें ठरविलें आहे. हॉटेल चालविण्यासाठी टेंडर्स मागविण्यांत आलीं असतां चढ्या दराचीं टेंडर्स आलीं. अशा तऱ्हेनें हॉटेल चालविण्यास देण्यास सरकारला धोका वाटत आहे. कारण, मोठी रक्कम भरून हॉटेल चालविण्यास घेऊन नंतर प्रवाशांकडून भरमसाठ दर उकळले जातील अशी भीति सरकारला वाटत आहे.

**इंग्रजी रामायणाला मदत**—भारत सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्यानें लंडनमधील एका संस्थेला इंग्रजी रामायणाचा तिसरा खंड प्रकाशित करण्यासाठी ५,००० रुपयांची देणगी दिली आहे. इंग्रजी भाषेंतील रामायणाच्या प्रकाशनासाठी आतांपर्यंत १२,००० रुपयांची मदत करण्यांत आली आहे. ह्या ग्रंथाच्या २०० प्रती देशांतील निरनिराळ्या ग्रंथालयांना वांटण्यांत येणार आहेत.

**वंगणाचीं तेलें तयार करण्याचा कारखाना**—भारताला दरसाल १५ कोटी रुपयांचें परदेशीय चलन देऊन २,२५,००० टन वंगणाचीं तेलें आयात करावीं लागतात. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर हीं तेलें तयार करण्याचा कारखाना काढण्याचा सरकार विचार करीत आहे. कारखाना काढल्यावर ९५ टक्के परदेशीय चलनाची बचत होऊं लागेल.

PRATIBHA

आणीन संगें

युवराजाला...

हो! आज सूनबाईनी माहेरून युवराजांना आणलं आहे. तुमच्या या लाडक्या बाळाला आणि पत्नीला दृष्ट लागूं नये, इडापिडा बाधूं नये म्हणून आजी दारांतच त्यांचेवरून भाकरीचा तुकडा ओवाळून टाकते. त्यांचं जीवन सुखाचं नी आनंदाचं व्हावं म्हणूनच हें सर्व आजी करीत असते ना!—पण या पेक्षां तुमच्या युवराजांना खरं संरक्षण मिळवून देणं तुमच्याच हातांत आहे. त्याचं आणि कुटुंबाचं भावी आयुष्य सुखाचं व्हावं म्हणून तुम्ही विमा उतरवा. विमा एजंट तुम्हांला परवडतील अशा अनेक योजना दाखवील.

"आज जे भविष्यकालाची तरतूद करतात तेच उद्यां सुखी होतात".



LIC-59-2

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

स्थापना १९३६
## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा
[ शेड्यूल्ड बँक ]
हेड ऑफिस–पॅलेस स्ट्रीट, चिमुटे निकेतन, सातारा शहर.
शाखा–मुंबई कोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी व फलटण.
लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरू करणेंत येत आहे.

ता. ३१-१२-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,४३,००० |
| ठेवी | रु. | १,५०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,७२,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १·५० |
| चालू डिपॉझिट | " | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्यावद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई
९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )
चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.
ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४४ लक्ष |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ८१ लक्ष |
| | रु. १ कोटी, २५ लक्ष |
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ५३ लक्ष |
| एकूण ठेवी : | रु. १२ कोटी |
| खेळतें भांडवल : | रु. २४ कोटींचे वर |

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा
भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.


जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



## इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक रचना परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरित्या काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.